E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.675

# AKSHARA

## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
May 2024 Special Issu 13 Volume III

# Chhatrapati Shivaji Maharaj's Governance: Then, Today and Tomorrow



**Guest Editor**
Prof. H. A. Mahajan
Principal
MTES' Smt. G. G. Khadse College, Muktainagar

**Executive Editor**
Dr. A. P. Patil
Vice Principal & Coordinator, IQAC

**Associate Editor**
Dr. P. S. Premsagar

**Co-Editor**
Dr. G. S. Chavhan
Dr. V. B. Dange
MTES' Smt. G. G. Khadse College, Muktainagar

Chief Editor : Dr. Girish S. Koli

Akshara Publication

Scanned with OKEN Scanner

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / **May 2024** / Special Issue 13 / Vol. III

# Index


| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 1 | शिवाजी महाराजांचे शेती आणि शेतकऱ्यांविषयी धोरण | प्रा. डॉ. नानाजी दगा भामरे | 05 |
| 2 | छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक : एक चिकित्सक अभ्यास | प्रा.डॉ.दिनेश रामदास महाजन | 10 |
| 3 | शिवकालीन जमीन महसूल पध्दती एक अभ्यास | प्रा. डॉ.बाळासाहेब नानासाहेब देवकाते | 15 |
| 4 | शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाची भूमिका आणि कार्यपद्धती | प्रा. डॉ. चित्रा पाटील | 19 |
| 5 | शिवकालीन किल्ले महत्त्व | ए. एम. देशमुख | 21 |
| 6 | छत्रपती शिवाजी महाराजांची आदर्श स्वराज्यमुद्रा | डॉ. मधुकर विठोबा जाधव | 27 |
| 7 | छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषयक धोरण | डॉ. दिपक दिनकर किनगे<br>श्री. मंगेश संतोष किनगे | 31 |
| 8 | छत्रपती शिवाजी महाराजांचे जनकल्याणकारी प्रशासन | डॉ.जगदीश दयासागर हेंडवे | 35 |
| 9 | छत्रपती शिवाजी महाराज कल्याणकारी राजा आणि त्यांचे व्यवस्थापन | प्रा. विवेक सुरेश श्रावगे | 38 |
| 10 | शिवकालीन कृषी व जमीन महसूल व्यवस्था | निता महेंद्र पाटील | 41 |
| 11 | पूर्व खानदेशातील शिवरायांच्या हालचाली | महेंद्र सुभाष वाणी | 44 |
| 12 | स्त्रीवादी लेखिका 'सिमा साखरे', 'अरुणा सबाने' यांचे ललित साहित्य : एक दृष्टिक्षेप | अनुप प्रदिप वानखडे | 47 |
| 13 | Chhatrapati Shivaji Maharaj as a Social Reformer | **Dr. Anushree Mahurkar** | 49 |
| 14 | The Modi Script: A Linguistic Tool in Chhatrapati Shivaji's Era | **Prof. Nazir Pathan** | 52 |
| 15 | Chhatrapati Shivaji Maharaj as a Social Reformer | **Mr. Madhavrao A. Patil** | 57 |
| 16 | The Ingenious Guerrilla Warfare Tactics of Chhatrapati Shivaji Maharaj | **Raju C. Pardeshi** | 60 |




Scanned with OKEN Scanner

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / May 2024 / Special Issue 13 / Vol. III

07

# छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषयक धोरण

**डॉ. दिपक दिनकर किनगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

**श्री. मंगेश संतोष किनगे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य होय. स्वराज्याच्या स्थापनेने मराठी माणसाची अस्मिता जागृत झाली. एक आदर्श लोकनेता म्हणून शिवाजी महाराजांनी सर्व जाती-पातीतील लोकांना आपल्या राज्यात महत्त्वाचे स्थान दिले, सर्वांचे कल्याण साधले. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत रयतेचा पुत्रवत सांभाळ केला. त्यामुळेच त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हे प्रत्येक जनतेला आपले राज्य वाटत होते. मध्ययुगीन काळामध्ये संपूर्ण भारतातील विविध राज्यकर्ते शेतकऱ्यांकडून खूप मोठ्या प्रमाणावर शेतसारा वसूल करत असत. प्रजाहितदक्ष शिवाजी महाराजांनी शेतसारा वसूल केला, मात्र त्या मोबदल्यात शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात सोयी सवलतीही उपलब्ध करून दिल्या. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधकाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कृषी विषयक धोरणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शिवकाळात जमिनीला भूमाता समजत असत. शेतकऱ्यांनी शेती केल्यावर ती उपजाऊ होत असे. शेतकरी हा समाजाचा उत्पादक घटक मनाला जात होता. मराठी राज्यात म्हणजे स्वराज्यात शेतकरी वर्गाला प्राधान्य त्यास नापीक जमीन पिकाऊ करण्यासाठी, लागवडीस आणण्यासाठी मोठमोठ्या सवलती दिल्या जात होत्या.[१]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्यांच्या ताब्यात जो मुलुख आला, त्यातील गावे वसाहतीस आणून शेतीची व्यवस्था करणे हे स्वराज्यातील एक मुख्य काम होते. ह्या कामाची मुख्य अंगे तीन (१) नापिकी जमीन पिकाऊ करणे; (२) पिकांचे व गावकरी आणि शेतकरी ह्यांचे रक्षण करणे व (३) राज्यांतील सर्व जमिनीचे मोजमापकरून सारा आकारणी करणे. ह्या तिन्ही गोष्टीस त्याकेळी लावणी, संचणी व उगवणी आणि चकबंदी, टकबंदी आणि जमाबंदी ही नावे होती.[२]

शिवकाळात शेतकरी वर्गासाठी विविध संज्ञा आढळतात. थळकरी, मिरासदार, उपरी, कुणबी इत्यादी संज्ञा वापरल्या जात. मिरासदार हा खालच्या किंवा उच्च जातीच्या कुटुंबात जन्मलेला शेतकरी होता आणि त्याच्याकडे गावात जमीन होती. ब्राम्हण, धोबी, मेंढपाळ आणि पाटील यांसारख्या जातींच्या कुटुंबात जन्मलेल्या पुरुषांना आणि जमिनीवर वंशपरंपरागत हक्क असलेल्यांना मिरासदार म्हणत. मिरासदारांना जमीन विकून जमिनीवरील हक्क सोडता येत होता. मिरासदारांचे गावात कायमचे घर होते. उपरी हे इतरांच्या मालकीची जमीन कसत. त्यांच्या ताब्यात कायमस्वरूपी जमीन नव्हती. वतनदार आणि इतरांच्या जमिनी त्यांना भाड्याने दिल्या होत्या.[३]

अ. रा. कुलकर्णी यांच्या मते, शिवकाळात कुणबी, मुजेरी, रया, कुळवाडी अशा विविध नावांनी शेतकऱ्यांचा संबोधले जात होते. कुणबी हा शब्द कुळंबी अथवा कुटुंबिक या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ शेतकरी अथवा शेती व्यवसायातील एक व्यक्ती असा आहे.[४]

शिवकाळात जमिनीला सामीन जमीन (उच्च जमीन), कटूबन आणि कुडथल (पडलेली जमीन किंवा नापीक जमीन), कुरण किंवा गवताची जमीन यासारख्या विशिष्ट संज्ञा दिसून येतात. याशिवाय लागवडीयोग्य जमिनीचे जिरायत (कोरडवाहू), बागायती, निपाणी बागायत (पुरेश्या पाण्याची जमीन नाही) या तीन प्रकारांमध्ये वर्गीकरण करण्यात आले. जिरायत जमीन पावसावर अवलंबून होती. दुस-या प्रकारची जमीन विहीर आणि नदीतून पाणी पुरवठ्यावर घेतली जात असे. बर्डी किंवा डोंगराळ जमीन, तळवट (डोंगरांच्या पायथ्याजवळील मुलूख) इत्यादी संज्ञा निकृष्ट परंतु लागवडीयोग्य जमीनिसाठी वापरल्या जात होत्या. पांढरी, गावठाण इत्यादी नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमिनी ह्या गावाच्या वस्ती असलेल्या जमिनीचा भाग होता.[५]



Scanned with OKEN Scanner

*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / May 2024 / Special Issue 13 / Vol. III

बागायत जमिनीचे 'पाटस्थळ आणि मोटस्थळ' असे दोन प्रकार होते. पाटस्थळ म्हणजे कालव्याच्या पाण्याने सिंचन केलेली जमीन. शिवकाळात मोटस्थळ म्हणजे विहिरीच्या पाण्यावर केली जाणारी शेतजमीन. नापीक जमिन सामान्यतः "निखार" म्हणून ओळखली जात होती. पडित, खडकमल (खडकाळ जमीन), गायरान (कुरण), खचरी (भाताची जमीन) अशीही जमिनीची विभागणी केली जात होती.[५] अव्वल, दुम, सिम आणि चाजत अशी जमिनीच्या उत्पादन क्षमतेच्या कसावरून प्रतवारी केली जात असे. अव्वल प्रतीच्या जमिनीचे प्रमाण अगदीच अल्प होते.[७] शिवकाळात वरील प्रमाणे जमिनीची प्रतवारी करून गुणवत्तेवर किंवा सुपीकतेवर जमिनीचे विविध प्रकार पाडण्यात आलेले होते.

शिवकाळात जमीन महसूल हे उत्पन्नाचे मुख्य साधन होते. शिवकाळात दादोजी कोंडदेव, मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांनी महसूल आकारणीची पद्धत विकसित केली होती. त्यापैकी अण्णाजी दत्तो याने ठरवलेली पद्धत उत्कृष्ट होती. शिवाजी महाराजांनी जमिनीची पाहणी करून जमिनीची वर्गवारी ठरवली व त्यानुसार सारा ठरविला. अण्णाजी दत्तोच्या पद्धतीनुसार जमीन मोजणी, पीक पाहणी व सारा आकारणी किंवा निश्चिती या तत्त्वानुसार सारा वसूल केला जात होता. या पद्धतीला 'पीक पाहणी' असे म्हणत असत.[८] स्वराज्यात सरकारला अनेक कर मिळत असे. त्या सर्वांमध्ये जमिन महसूल सर्वाधिक महत्त्वाचा होता. कारण राज्याच्या उत्पन्नाचे ते मुख्य साधन होते.

जमिनीची मोजणी हा जमीन महसूल व्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक होता. शिवकालात जमीन मोजणीसाठी 'काठी'चा वापर केला जात असे. या काठीला 'शिवशाहीकाठी' असे म्हणतात. शिवशाहीकाठी पाच हात व पाच मुठी इतक्या लांबीची असे. एक हात सात मुठींचा व एक मूठ दोन तसूंची असे प्रमाण मानले जाई. (एक मूठ म्हणजे अंगठ्याजवळचे बोट व करंगळी यामधील अंतर व एक तसू म्हणजे दोन बोटांच्या सांध्यातील अंतर). अशाप्रकारे पाच हात व पाच मुठी यांनी बनलेल्या वीस चौरस काठ्यांचा मिळून एक "पांड" होई आणि अशा वीस पांडांचा मिळून एक "बिघा" होई. एकशे वीस चौरस बिघे मिळून एक "चावर" होई.[९] जमिनीच्या या मोजणीला बिघावणी, चावरणा अथवा चकबंदी असे म्हणत. जमीन मोजण्याचे काम गावातील महाराकडे असे.[१०] जमीन मोजणी करताना प्रत्येक खेड्यातील एकंदर जमीन किती, त्यात पिकाऊ किती व पंडिक किती याची नोंद ठेवली जात असे.

शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत स्वराज्यातील जमिनीची तीन वेळा मोजणी होऊन सारा आकारणी झाली. प्रथम पुणे जहागिरीत दादोजी कोंडदेवच्या वेळी १६३६ साली ही सारा आकारणी पुणे, मुठे व मावळ या भागात झाली. नंतर १६४८-४९ साली मोरोपंत पिंगळे यांनी शिरवळ परगण्यात मोजणी करून सारा आकारणी केली; आणि शेवटी स्वराज्यातील सर्व प्रदेशांची मोजणी व सारा आकारणी आण्णाजी दत्तो या महाराजांच्या सचिवाने १६७८ साली केली.

आण्णाजी दत्तोने स्वराज्यातील परगण्याच्या अधिकाऱ्यांना म्हणजे देशमुख-देशपांडे यांना परगण्यातील गावोगाव फिरून पाटील व रयत यांच्याशी संपर्क साधून प्रत्येक गावातील जमिनीच्या प्रतवारीचे पत्रक तयार करण्यास सांगितले. अशा प्रकारची प्रतवारी म्हणजे 'बिघावणी' होय. त्यानंतर कोणत्या जमिनीत कोणत्या प्रकारचे पीक येते व त्याचे अंदाजे उत्पन्न किती होते, याचे पत्रक तयार केले गेले. यास 'पीक पाहाणी' असे म्हणतात. अशाप्रकारे 'बिघावणी आणि पीक पाहाणी' झाल्यानंतर त्यांची पत्रके आण्णाजी दत्तोकडे पाठविली गेली. त्याने त्या पत्रकांची छानणी करून प्रत्येक परगण्याचा महसूल दर म्हणजे "सारा आकारणी" ठरवून दिली.[११] म्हणजेच शिवकाळामध्ये जमीन मोजणी व जमीन महसूल आकारणी ही कामे परगण्यातील देशमुख-देशपांडे, गावातील पाटील-कुलकर्णी, तसेच बलुतेदार महार या सर्वांच्या सहकार्याने होत असत.

सारा आकारणी करताना प्रथमतः पिकाचा विचार केला जाई. निरनिराळ्या प्रकारच्या पिकांवर निरनिराळे दर आकारले जात. सारा आकारणीसाठी सरकारच्या दप्तरात लागवडीखालील जमीन, जमिनीत घेतली जाणारी पिके आणि अंदाजे उत्पन्न या सर्वांची माहिती असावी लागे. महसूल अधिकाऱ्यांनी आपल्या शेतातील पिकाखाली असलेली जमीन अधिक दाखवल्यामुळे आपल्याला अधिक सारा भरावा लागतो, अशी तक्रार शेतकऱ्यांनी केल्यास, पड जमीन किती आहे आणि पिकाखाली किती आहे, याची चौकशी केली जात असे. शेतकऱ्याच्या तक्रारीत तथ्य आढळल्यास गावच्या पाटलाला दप्तरात दुरुस्ती करण्याचा आदेश दिला जात असे.[१२] म्हणजेच शिवाजी महाराज शेतकऱ्यांच्या तक्रारीविषयी आणि त्यांना न्याय देण्यासाठी दक्ष असत हे दिसून येते.



Scanned with OKEN Scanner

प्रत्येक बिघ्यामागे सरकारी साऱ्याचे प्रमाण किती होते यासंबंधी सभासद म्हणतो- "बिघेयास पिकाचा आकार करून पाच तक्षिमा (भाग) पिकाचे करून तीन तक्षिमा रयतेस द्यावा, दोन तक्षिमा दिवाणात (सरकारात) घ्याव्या, येणे प्रामाणे रयतेपासून घ्यावे." शिवाजी महाराजांच्या काळात नख्त आणि ऐन जिन्नसी अशा दोन्ही स्वरूपात वसूल घेतला जाई. हे दोन्हीं मिळून साऱ्यांचे प्रमाण बहुधा उत्पन्नाच्या दोन पंचमांश इतके असावे. जमीन महसुलाचे नख्तदर हे सामान्यतः बागायत जमिनीतील पिकावर आकारले जात होते. पैसे घेऊन हे जिन्नस शेतकरी बाजारात विकत असल्याने नख्त रूपाने सारा देणे त्यांना कठीण जात नसावे.[१३] यावरून शिवकाळात नख्त म्हणजे रोख आणि ऐन जिन्नसी म्हणजे धान्याच्या स्वरूपात सारा वसूल केला जात होता.

दुष्काळ, महापूर, वादळ, रोगराई अशा नैसर्गिक आपत्तींच्या वेळी, तसेच शत्रुपक्षाने पीक नष्ट केल्यास होणाऱ्या नुकसानीच्या वेळी शेतसाऱ्यात काही सवलत देण्याचे व शेतकऱ्यांना मदत करण्याचे धोरण शिवाजी महाराजांनी अवलंबले. १६५७ मध्ये सुपे प्रांतात दुष्काळ पडला. तेव्हा शिवाजी महाराजांनी बी-बियाणे व शेतीच्या अवजारांसाठी शेतकऱ्यांना कर्जे दिली. या कर्जावर कोणतेही व्याज आकारण्यात आले नव्हते.[१४] म्हणजे नैसर्गिक आपत्तींच्या वेळी शेतकऱ्यांना सरकारकून सवलत मिळत होती.

राजश्री रामजी अनंत सुभेदार मामले प्रभावळी प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत "तुला पूर्वी फर्माविले आहे. येसियासी चोरी न करावी. इमाने इतबारे साहेब काम करावे. अशी तू क्रियाच केली आहेस. तेणेप्रमाणे एक भाजीच्या देठासही मन न दाखविता, रास्त व दुरुस्त वर्तन ठेवणे. लावणी-संचणी ज्यावेळी करावयाची त्यावेळी करणे. मुलखात बटाईचा (ऐनजिनसी शेतसारा) तह चालत आहे. त्याप्रमाणे रयतेचा वाटा रयतेस पावे व राजभाग आपणास येई ते करणे. रयतेवर काडीचा जाच वगैरे केलिया साहेब तुजवर राजी नाही ऐसे बरे समजणे. दुसरी गोष्ट की रयतेपासून ऐन जिनसाचे नख्त (रोकड पैसा) घ्यावा ऐसा हुकूम नाही. ऐन जिनसाचा ऐन जिनसच वसूल घेऊन जमा करीत जाणे."[१५] शिवाजी महाराजांनी प्रभावळीच्या सुभेदाराला सन १६७६ मध्ये दिलेल्या आदेशावरून असे दिसते कि, रयतेला थोडासाही त्रास होऊ नये याची काळजी महाराज घेत असत. तसेच सुभेदाराने इमानदारीने कर्तव्य पार पडावे आणि रायतेप्रती वागणूक चांगली ठेवावी, याची जाणीव त्याला करून दिली.

"शिवाजी महाराज शिवापुरास येऊन बाग-आमराई लाववायाकरिता धरणाचे काम लावले. ते समयी भोवरगावचे पाटील जमा झाले. पण धरणाचे पाणी निघावयास एक मोठा धोंडा आड येत होता. त्यामुळे पाणी निघेना. म्हणून येस पाटील तेथे कामावर होता. त्यास महाराजांनी आज्ञा केली की आम्ही स्वारीहून येतो तोपावेतो हर इलाज करून एवढा मोठा धोंडा फोडून काढून पाण्यास वाट करणे. ऐसी आज्ञा करून महाराजांची स्वारी गेल्यावर मागे येस पाटलाने हर इलाज करून धोंडा फोडून पाण्यास वाट सुरळीत करून दिली."[१६] येस पाटलाने धरणाच्या पाण्यासाठी वाट मोकळी केल्यामुळे महाराजांनी त्याला जमीन इनाम दिली होती. या घटनेवरून शिवाजी महाराज शेतीच्या सिंचनाविषयी किती जागरूक होते हे स्पष्ट होते. आणि अशा महत्त्वपूर्ण कामात मदत करणाऱ्या लोकांना बक्षीस देत असल्याचे दिसते.

शिवकाळामध्ये राज्याच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा भाग म्हणजे शेतसारा होय. मात्र शेती हा व्यवसाय अत्यंत कष्टाचा. त्यासाठी मनुष्यबळाची मोठी गरज होती. परंतु अनेकदा दुष्काळातील मनुष्यहानीमुळे तसेच घरातील कर्ती माणसं स्वराज्यकार्यात गुंतल्यामुळे शेती व्यवसायासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होत नव्हते. शेतजमीन कसण्यासाठी बैलजोडी ही अतिशय महत्त्वाची होती. अनेकदा शत्रू आपली जनावरे चोरून नेत असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठी धास्ती वाटे. तसेच जनावरे चोरीला गेल्यामुळे त्यांच्या व्यवसायात अडचणी निर्माण होत असत. म्हणून अशा गरजू शेतकऱ्यांना बैलजोडी विकत घेण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची तजवीज शिवाजी महाराजांनी करून दिली होती. या आर्थिक सहाय्याचा परतावा बिनव्याजी आणि शेतकऱ्याच्या सवडीप्रमाणे हप्त्याहप्त्याने वसूल करावा, असा आदेशही महाराजांनी दिला होता. बैलजोडीबरोबरच शेतकामासाठी नांगर या अवजाराची मोठी गरज शेतकऱ्याला असे. नांगर खरेदी करून घेण्यासाठी किंवा सुतार, लोहार यांच्याकडून शेतीची अवजारे बनवून घेण्यासाठीसुद्धा सरकारातून शेतकऱ्यांना कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. बैलजोडी, नांगर याशिवाय शेतातून पीक उगवण्यासाठी शेतकऱ्याला उत्तम बी-बियाण्याची महत्त्वाची गरज असे. काही शेतकरी बियाणे म्हणून उत्तम दाणा (धान्य) काढून काळजीपूर्वक जतन करून ठेवीत. मात्र वेळप्रसंगी त्यांना



Scanned with OKEN Scanner

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / May 2024 / Special Issue 13 / Vol. III

आपल्या उदरनिर्वाहासाठी त्याचा वापर करावा लागत असे. तेव्हा ऐन पेरणीच्या काळात सावकाराकडून दुप्पट दाम देऊन शेतकऱ्याला पीक पेरणीसाठी बी-बियाणे विकत आणावे लागे. म्हणून बियाणे घेण्यासाठी एखाद्याला पैशाची गरज असेल तर त्याला सरकारी पैसा उपलब्ध करून द्यावा, असा आदेशही शिवाजी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिला होता. शेती करण्यासाठी आणि स्वतःचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अनेक वेळा शेतकरी लोक गावातील शेटे-महाजन, सावकार यांचे कडून २५ टक्के दराने कर्ज घेत असत. अशा गरजू शेतकऱ्यांसाठी शिवाजी महाराजांनी सरकारी खजिन्यातून धान्य देण्याची व्यवस्था केली. "पोटास दाणे नाही.... तरी पोटास खांडे दो खांडे दाणे द्यावे," असे महाराजांनी म्हटले होते.[१७] थोडक्यात रयत सुखी तर राज्य सुखी असे शिवाजी महाराजांचे धोरण होते. या आपल्या धोरणानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेला सुखी ठेवले, त्यांचे कल्याण केले. त्यांच्या सर्व समस्यावर उपाय योजले. लोककल्याणकारी, प्रजाहितदक्ष शिवाजी महाराजांना शेतकऱ्यांच्या प्रत्येक सुख-दुखाची, अडी-अडचणींची संपूर्ण जाणीव होती. म्हणून त्यांना जाणते राजे म्हणून संबोधले जाते. एकंदरीत शिवाजी महाराजांना आपले स्वराज्य हे सुराज्य बनविले होते. आज एकविसाव्या शतकातही शेतकऱ्यांना शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. शेतीउपयोगी महाग बी-बियाणे, खते, किटकनाशक आणि औजारे यामुळे आजचा शेतकरी कर्जबाजारी व हवालदिल झाला आहे. शासकीय योजनांच्या माहितीचा अभाव आणि प्रशासनातील भ्रष्टाचार यामुळे शेतकरी सरकारला आज मायबाप सरकार मानत नाही. म्हणूनच वर्तमानकाळातील राज्यकर्त्यांपेक्षाही शिवाजी महाराजांचे कृषीविषयक धोरण हे दूरदृष्टीचे होते.

**संदर्भ**

१) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड (भाग १) शिवकाल (इ. स. १६३०-१७०७), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर, २००६, पृ. क्र. ३८८
२) कित्ता
३) Mahajan T. T., Aspect of Agrarian and Urban History of the Marathas, Commonwealth Publication, New Delhi, Revised Addition, 2022, Page No. 36
४) कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९७, पृ. क्र. ५१-५२
५) Mahajan op. cit., Page No. 28
६) Ibid, Page No. 29
७) कुलकर्णी, उपरोक्त, पृ. क्र. ५२
८) सावंत बी. एस., जाधव वि. के., मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९७, पृ. क्र. ६७
९) पवार जयसिंगराव, शिवाजी व शिवकाल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, चतुर्थ आवृत्ती, १९९९, पृ. क्र. २९२
१०) कुलकर्णी, उपरोक्त, पृ. क्र. ६२
११) पवार, उपरोक्त, पृ. क्र. २९२
१२) कुलकर्णी, उपरोक्त, पृ. क्र. ६३
१३) कित्ता, पृ. क्र. ६३-६४
१४) मोरे अरुणा आणि इतर, शिवाजी व शिवकाळ, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१३, पृ. क्र. १७४
१५) भावे वा. कृ., महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास शिवकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती २०१०, पृ. क्र. २७१
१६) कित्ता, पृ. क्र. २७३
१७) कुलकर्णी, उपरोक्त, पृ. क्र. ५२-५३



Scanned with OKEN Scanner